# प्रेस नोट

**अनाथ आश्रामात शिक्षणासाठी राहत असलेल्या बालकावर अनैसर्गिक लैगिंक अत्याचार करणारा विधीसंघर्षित बालक व सदर अत्याचार दडपण्याचा प्रयत्न करणरा आश्रमचालक यांचेवर बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल.**

काल दिनांक २७/०९/२०१७ रोजी बाई नामे सौ. प्रतिभा गोविंद थापा, वय ३१, धंदा घरकाम, रा. पाटील इस्टेट झोपडपट्टी, गल्ली नं ८, शिवाजीनगर, पुणे-५, मो नं ८००७३९८५८२ ह्या अत्यंत भेदरलेल्या आवस्थेत पोलीस आयुक्त कार्यालय येथे आलेल्या असताना त्यांची भेट युनिट-२ येथे कार्यरत असलेले पो हवा दिनेश गडांकुश यांचेशी झाली, त्या खूपच भेदरलेल्या व घाबरल्यासारख्या दिसत असलेने त्यांनी चौकशी केली असता त्यांनी त्यांचे मुलावर अत्याचार झाले आहेत व त्याची तक्रार करु नये म्हणून खूप दबाव असल्याचे सांगून रडू लागल्या, त्यांना लागलीच पो हवा दिनेश गडांकुश यांनी पो नि श्री सतिश निकम यांचे कार्यालयात आणून त्या सांगत असलेल्या घटनेबाबत पो नि सतिश निकम यांना कल्पना दिली. सदर महिला खूपच भेदरलेल्या असल्याने पो नि श्री निकम यांनी त्यांना धीर देवून काय झाले याबाबत चौकशी केली असता त्यांनी त्यांचा मुलगा जून २०१७ पासून इयत्ता ६ वी मध्ये सरस्वती आश्रम, दापोडी येथे शिक्षणास व राहणेस आहे. ऑगस्ट महिन्यात तो आजारी असल्याचा संस्थाचालक सुरवसे यांचा फोन आल्याने त्या त्याला भेटणेस गेल्या असता तो खूपच आजारी व अशक्त झालेला दिसला तसेच त्याचे डोळे पिवळे पडलेले दिसले म्हणून संस्थाचालकांची परवानगी घेवून त्या त्याला घरी घेवून येत असताना रस्त्यात त्याने त्याला रोज रात्री त्याचेच आश्रमात राहत असलेला इयत्ता १० वी मध्ये शिकणारा मुलगा झोपू देत नसल्याचे सांगितले त्यावर त्यांनी त्याचेकडे अधिक चौकशी केली असता सदरचा मुलगा त्याचेवर अनैसर्गिकरित्या अत्याचार करत असल्याची माहिती समजली त्यामुळे त्यादेखील खूप घाबरून गेल्या. चार दिवस त्यांनी मुलावर काविळीचे उपचार केले व झाले घटनेबाबत त्याला घेवून आश्रमात गेल्या असता संस्थाचालकाने पाहिजे तसा गंभीरपणे प्रतिसाद न दिल्याने त्या मुलाला घेवून परत घरी आल्या. घरी असताना त्यांनी पुन्हा आश्रमचालक यांना फोन करून अत्याचार करणारे मुलावर कारवाई करणेस सांगितले अन्यथा पोलीसांत तक्रार देणार असल्याचे सांगितले त्यावर आश्रमचालक हे त्यांचे राहते घरी येवून तक्रार देवू नका, संस्थेची व तुमच्या मुलाची बदनामी होईल अशी भिती घालून मुलाचे उपचाराचे पैसे मी देतो असे अमिष दाखवून निघून गेले. दरम्यान मुलाची परिक्षा असल्याने आश्रमचालकांनी त्याला आश्रमात आणून सोडून जाणेबाबत त्यांना कळविले, त्याप्रमाणे त्या आश्रमात गेल्या असता तेथे संस्थाचालक यांनी अगोदरच अत्याचार करणारे मुलाचे घरच्यांना बोलावून घेतलेले होते, तेथे सदर प्रकरण वाढवू नये म्हणून त्यांचेवर भावनिक दडपण आणले व मुलाचे उपचारासाठी रु. १२,०००/- दिले व अत्याचार करणारे मुलाकडून त्यांचे मुलाला पुढे कोणत्याहीप्रकारे त्रास होणार नाही अशी स्वतःची व मुलाची आईची हमी देवून एका कोऱ्या कागदावर अत्याचार करणारे मुलाचे आई व त्यांची सही घेवून तो कागद त्यांचेकडेच ठेवून घेतला. परिक्षा झालेनंतर मुलगा परत आजारी पडल्याने त्यांनी त्याला परत घरी आणून खाजगी डॉक्टरांकडे तपासणी केली असता त्याला झोप न झाल्याने अंतर्गत जंतू संसर्ग व पांढऱ्यापेशी वाढल्याचे सांगितले व त्यावर ॲडमीट करुन उपचार केले आहेत अशी धक्कादायक कहाणी सांगितली. सदर प्रकारामुळे त्यांचे पिडीत मुलास खूप शारीरीक त्रास होत असल्याने व तो खूप घाबरलेला असल्याने त्या अत्यंत दबावाखाली असताना देखील हिंमत एकवटून झाले प्रकाराबाबत पोलीस आयुक्त कार्यालयात तक्रार

देणेसाठी आल्याचे सांगितले. त्यांनी सांगितलेले हकिकतीचे गांभीर्य ओळखून लागलीच पो नि सतिश निकम यांनी सदर बाबत वरिष्ठ अधिकारी यांना कळवून सदर घटनेतील पिडीत मुलगा याची आई नामे सौ. प्रतिभा गोविंद थापा, वय ३१, धंदा घरकाम, रा. पाटील इस्टेट झोपडपट्टी, गल्ली नं ८, शिवाजीनगर, पुणे-५, मो नं ८००७३९८५८२ यांची लेखी फिर्याद घेणेत येवून स्टापकरवी अत्याचार करणारा विधीसंघर्षित मुलगा व आश्रम चालक देविदास लक्ष्मण सुरवसे वय ४३ रा. सरस्वती आश्रम, दापोडी, पुणे यांना ताबेत घेवून भोसरी पोलीस ठाणे येथे रिपोर्टाने हजर करणेत आले आहे. झाले घटनेच्या अनुशंगाने भोसरी पोलीस ठाणे गुरनं ४२५/२०१७ भादंवि सं कलम ३७७,५०६ बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ४, १९ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. पुढील तपास भोसरी पोलीस ठाणेमार्फत करणेत येत आहे

**ही कामगिरी, श्री प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे श्री सुरेश भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पो नि श्री सतिश निकम, सपोनि श्री अन्सार शेख, पो हवा दिनेश गडांकुश, अस्लम पठाण, अजय खराडे पो ना चंद्रकांत महाजन यांनी केलेली आहे.**